**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २७७** **दिनांक :- ०२/१०/२०२१**

# सायबर गुन्हयांना आळा घालण्यासाठी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वतीने जनजागृती अभियान.

दिनांक ०१/१०/२०२१ रोजी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या स्थापनेस एक वर्ष पुर्ण झाल्याने पोलीस आयुक्तालयाचे वतीने दिनांक ०१/१०/२०२१ ते ०७/१०/२०२१ रोजी पावेतो पोलीस आयुक्त कार्यालय, शाखा व सर्व पोलीस स्टेशन येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने विरार पोलीस ठाण्याच्या वतीने दिनांक ०१/१०/२०२१ रोजी सायबर गुन्हयांना आळा घालण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी अभियान राबविण्यात आले आहे. सदर कार्यक्रमादरम्यान कॉलेज मधील प्राध्यापक, विदयार्थीनी, डॉक्टर, नर्सेस, बँक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सायबर गुन्हयांमार्फत नागरिकांची कशी फसवणुक केली जाते व त्यापासून नागरिकांनी कशाप्रकारे सावध रहायला हवे याकरिता सदर अभियाना दरम्यान माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमामध्ये वक्ते म्हणून श्रीमती रेश्मा साळुंखे व सायबर तज्ञ श्री विक्रांत पवार यांनी मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमप्रसंगी श्री प्रशांत वाघुंडे, पोलीस आयुक्त परिमंडळ-३, श्रीमती रेणुका बागडे, सहा पोलीस आयुक्त व विरार पोलीस स्टेशनचे अधिकारी-अंमलदार उपस्थित होते.

